सत्यमेव जयते

# भारताचे संविधान

स्वातंत्र्य
बंधुता
समानता
न्याय
धर्मनिरपेक्षता
समाजवाद

## माझी ओळख

आम्ही नागरिक भारताचे । बनवितो संविधान आमुचे ।
घेऊनिया अधिष्ठान तत्त्वांचे । पुढीलप्रमाणे ।।1।।

सार्वभौम प्रजासत्ताक । समाजवादी अन् धर्मनिरपेक्ष ।
लोकशाही गणराज्य । असेल आमुचे हे ।।2।।


सामाजिक आणि आर्थिक । आणि तैसेची राजकीय ।
ऐसा असेल सकळांस । न्याय येथे ।।3।।

विश्वास श्रद्धा व पूजेचे । विचार अन् अभिव्यक्तीचे ।
ऐसे असेल साचे । स्वातंत्र्य सकळा ।।4।।

खूण बंधुतेची सकळा पटावी । प्रतिष्ठा वाढावी व्यक्तीची ।
आणि यांचे संगे स्थिर राहावी । एकता अखंडितता राष्ट्राची ।।5।।

करितो असा निर्धार । संविधान सभेत ।
सव्वीस नोव्हेंबरास । एकोणिसशे एकोणपन्नासच्या ।।6।।

ऐशा या प्रकारे । संविधान बनवितो ।
स्वीकारतो आणि अर्पितो । स्वतः प्रती ।।7।।



तुम्हाला कोणता खेळ आवडतो? त्या खेळाचे नियम तुम्हाला पाळावेच लागतात. नाही का? फुटबॉलसाठी एका संघाच्या खेळाडूंची संख्या असते 11. एखादा जादा खेळाडू घेऊन खेळ खेळला तर चालेल? कबड्डीच्या मैदानाची मापं बदलून खेळ खेळला तर चालेल? नाही चालणार !


घराचे, शाळेचे काही काही नियम ठरलेले असतात. कोणकोणते नियम तुम्हाला ठाऊक आहेत? हे नियम मोडले तर तर काय होईल? केवळ नियम पाळण्यासाठी खेळ खेळायचा का आनंदासाठी ? प्रगतीसाठी ?

घर नीट चालावं, शाळेचं काम नीट व्हावं, प्रत्येकाला फायदा व्हावा किंवा खेळाचा खरा आनंद मिळावा म्हणून हे नियम असतात. नियम मोडल्याने शिक्षा होते हे खरेच पण केवळ शिक्षेच्या भयाने आपण नियम पाळले, असे असता कामा नये. नियमांचे पालन केल्याने सर्वांनाच फायदा होतो या भावनेने नियम पाळावेत.

जसं घराचं, शाळेचं, आपल्या गटाचं, आपल्या वर्गाचं, तसंच आपल्या देशाचं! देशासाठीही असेच नियम असतात. जसं, घराचे काही नियम बदलतात तसंच देशाचेही काही नियम बदलतात. मग बदललेल्या नियमांनी देशाचे काम सुरु राहतं. काही वेळेस, शाळेची वेळ, विषय, विद्यार्थ्यांचा गणवेश बदलतात ना, तसंच काहीसं हे आहे. पण हे थोडं मोठ्या प्रमाणावर आणि थोडं अधिक गंभीर देखील आहे.

आपला देश पारतंत्र्यात होता इंग्रजांच्या. सन 1818 पासून 1947 पर्यंत. प्रत्यक्षात सुमारे दीडशे वर्ष इंग्रजांनी राज्य केलं आपल्यावर. त्यांच्या कालखंडात त्यांनी त्यांना हव्या असणाऱ्या नियमांचं पुस्तक तयार केलं आणि वापरलं. अनेकांच्या अनेक वर्षांच्या प्रयत्नांनंतर देश स्वतंत्र झाला. आपल्या देशबांधवांच्या प्रगतीसाठी, देशाच्या प्रगतीसाठी आपण आपल्याला आवश्यक नियमांचं पुस्तक तयार केलं. हे पुस्तक म्हणजे राज्यघटना, हे पुस्तक म्हणजे संविधान. अर्थात हे केवळ नियमांचे पुस्तक नाही तर प्रगत भारताचं ते एक स्वप्नही आहे. भारताच्या आकांक्षा त्यात आहेत.






डॉ.राजेंद्रप्रसाद
(घटनासमितीचे अध्यक्ष)



डॉ.बाबासाहेब आंबडेकर
(घटनामसुदा समितीचे अध्यक्ष)



सर बी. एन्.राव
(सल्लागार, घटनासमिती)



एस्. एन्. मुखर्जी
(मसुदा लेखक)

घराचे, शाळेचे नियम मोठी माणसं तयार करतात. त्यांचं वय जास्त असल्यानं,अनुभव अधिक असल्यानं, ज्ञान अधिक असल्यानं आपण ती परंपरा मानतो. मग देशासाठीचं पुस्तक तयार करायलाही मोठ्या लोकांनी लक्ष घातलं. त्यांच्यात चर्चा झाली. काही प्रसंगी वादही झाले पण अखेर असं पुस्तक, असं संविधान तयार झाले.

आपल्याकडे राज्यांचा कारभार सांभाळण्यासाठी राज्यशासन काम पाहते तर देशाचा कारभार सांभाळण्यासाठी केंद्र सरकार काम पाहाते. म्हणून संविधानात काही बाबी केंद्रशासनासाठी तर काही बाबी राज्यशासनासाठी लिहिल्या गेल्या आहेत. काही बाबी दोघांनी मिळून पाहावयाच्या असं ठरलं.

आपल्या देशात खूपच विविधता आहे. भाषेची विविधता आहे, संस्कृतीचीही विविधता आहे. अनेक धर्मांचे लोक इथं राहतात. वेशभूषाही खूपच भिन्न भिन्न आहे. कुठं सुपीक जमीन तर कुठं वाळवंट! कुठं विस्तीर्ण म्हणजे भला मोठा सपाट भूभाग तर कुठं पर्वतांच्या रांगाच रांगा ! या भौगोलिक विविधतेनेही तिथल्या परंपरा, चाली, रुढी, जगण्याच्या पद्धती यात विविधता निर्माण झाली. अशा विविधतेने नटलेल्या देशाचं संविधानही सगळ्यांना न्याय देणारं हवं ना? तसं ते करण्याचा प्रयत्न केला आहे. संविधानाच्या निर्मितीचा इतिहास तयार झाला आहे !

आपला देश स्वतंत्र झाला 15 ऑगस्ट 1947 ला. पण देशाला लवकरच स्वातंत्र्य मिळणार हे 1942 पासूनच लक्षात यायला लागलं त्यामुळं आपण अगोदरपासूनच संविधान निर्मितीची व्यवस्था करायचं ठरवलं. नवीन भारताच्या जडणघडणीवर सखोल प्रभाव टाकणारी ही व्यवस्था भारताच्या प्रगतीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची, मोलाची आणि बराच काळ परिणाम करणारी अशी आहे.

देशाची घटना तयार करण्यासाठी 2 वर्षे 11 महिने 18 दिवस काम झाले. घटनासमितीचे एकूण सभासद होते 308. एकूण 11 वेळा अधिवेशनं झाली. मूळचा मसूदा 243 कलमे आणि 13 परिशिष्टांचा होता आणि अंतिम मसूदा 395 कलमांचा आणि 8 परिशिष्टांचा !

घटनेचा कच्चा मसुदा, सरकारचे घटनाविषयक सल्लागार सर बी.एन्.राव यांनी तयार केला. त्यास अंतिम स्वरुप दिले घटना मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबडेकर यांनी आणि त्यांनी घटना समितीचे अध्यक्ष डॉ.राजेंद्रप्रसाद यांचेकडे तो सूपूर्त केला.

व्यक्तिस्वातंत्र्य, न्याय, समता आणि जबाबदार शासन या तत्वांवर आधारित असे भारताचे संविधान म्हणजे भारताच्या इतिहासात अपूर्व व अनन्य साधारण घटना आहे. खूप महत्त्वाची घटना आहे.



डॉ.आंबेडकर आणि डॉ.राजेंद्रप्रसाद



पं.जवाहरलाल नेहरु स्वाक्षरी करताना



# भारताचे संविधान

''आम्ही भारताची जनता भारताचे एक सार्वभौम समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही प्रजासत्ताक(गणराज्य) घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास आणि उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची समानता, निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन आजच्या संविधान सभेत आज दि. 26 नोव्हेंबर 1949 रोजी हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करुन स्वतः प्रत अर्पण करत आहोत.''

भारताच्या राज्यघटनेचा महत्त्वाचा भाग म्हणजे त्याचं प्रास्ताविक होय. या प्रास्ताविकात वापरलेले शब्द महत्त्वाचे आहेत. यांचा अर्थ नीट समजायलाही खूपदा खूप काळ जातो. महत्त्वाचे असे काही शब्द, काही मुद्दे पुढे आहेत.

## आम्ही भारताचे लोक :

पारतंत्र्यातून मुक्तता झाल्यावर सगळ्या भारतीय लोकांनी लोकांसाठी तयार केलेल्या स्वत:साठीच्या नियमांचे पालन करण्याचे व्रत घेतले आहे. देशाचं संविधान देवाला अर्पण करण्यासाठी, किंवा महात्मा गांधींना अर्पण करण्यासाठी सुचवलं असतानाही, समितीनं ते भारतीय नागरिकाने स्वत:ला अर्पण केल्याचं नमूद केलं आहे.

## बंधुता :

दुसऱ्याच्या मताचा आदर करणं खूप आवश्यक आहे. दुसऱ्यांचं मत आपल्या मताच्या विरुद्ध असले, कदाचित पूर्णपणे चुकीचं असलं तरीही त्याच्या मताचा आदर करायला हवाच. स्वातंत्र्य आणि समता या शब्दांचा खरा अर्थ 'बंधुता' शब्दानेच अनुभवता येतो !





### स्वातंत्र्य :

कोणतंही बंधन नसणे म्हणजे स्वातंत्र्य. अर्थात व्यक्तीच्या वा समाजाच्या प्रगतीला आवश्यक असणारी बंधनं पाळणं आवश्यकच आहे. स्वातंत्र्य म्हणजे कसंही, कुठंही, कुणीही, काहीही वागणं नव्हे. शाळेची वेळ पाळायचं बंधन पाळलं नाही तर चालेल ? भाषणाचं, स्वत:च मत देण्याचं, मालमत्ता सांभाळण्याचं वा वाढवण्याचं स्वातंत्र्य घटनेनं आपल्याला दिलंय. स्वत:च्या इच्छेने धर्म बदलण्याचे स्वातंत्र्यदेखील भारतीय नागरिकास घटनेने दिले आहे.

### समानता :

धर्म, जात, स्त्री–पुरुष, जन्मस्थळ यांचा विचार न करता विकासाची संधी मिळण्याची तसेच राजकीय, आर्थिक आणि सामाजिक समता कायद्याने बहाल केली आहे. कामाची संधी मिळण्यात अथवा देण्यात श्रेष्ठ–कनिष्ठ असा भेदभाव नको असं संविधान म्हणतं.

### न्याय :

भारतातील सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय, संविधानाने दिला आहे. सरकारच्या नियंत्रणापासून भारतीय न्यायसंस्था पूर्णपणे मुक्त ठेवण्याची संविधानाची भूमिका आहे.

### धर्मनिरपेक्षता :

माझ्या धर्माबद्दल जसा मला अभिमान असतो तसा दुसऱ्या धर्माच्या व्यक्तीलाही त्याच्या धर्माबद्दल आदर असतो हे समजून घ्यायला हवं. देशाचं सरकार एका विशिष्ट धर्माच्या लोकांसाठी नाही आणि धार्मिक आधारावर ती व्यवस्था उभी नाही. ती व्यवस्था कुठल्याही धर्माच्या विरोधातही नाही. देशाच्या कायद्याच्या आधीन राहून धार्मिक स्वातंत्र्य उपभोगण्यास संविधान मान्यता देते.

### समाजवाद :

समान कामांबाबत समान वेतन, उत्पादनाची साधने काही विशिष्ट गटांकडेच नसणे, मनुष्यनिर्मित विषमता काढून टाकण्यासाठी राज्यसंस्थेस कल्याणकारी योजनांची व्यवस्था उत्पन्न करण्याचा अधिकार असे मुद्दे यात आहेत.

26 नोव्हेंबर 1949 – घटनासमितीनं संविधान स्विकारलं
26 जानेवारी 1950 – देशात संविधान लागू



सरदार वल्लभभाई पटेल

## संविधानाची ठळक वैशिष्ट्ये :

**1. लिहिलेली मोठी राज्यघटना !**

आपल्या, नियमांचं आणि देशाचं काम कसं चालावं याचं पुस्तक खूप मोठ्ठं आहे हे. पुस्तकात एकूण 22 धडे आहेत आणि 395 कलमं. कलमं म्हणजे काय? लिहिलेल्या अनेक बाबींपासून तयार झालेले एकेका विषयाचे अनेक मुद्दे! यांना दुसरा अवघड शब्द आहे ‘अनुच्छेद’. याखेरीज 8 याद्या नव्यानं जोडल्यात. (आता या याद्यांची संख्याही वाढली आहे)

राष्ट्रपती, राज्यपाल, न्यायाधीश, पंतप्रधान, मंत्री यांचे अधिकार कोणते, त्यांनी काम कसं करावं, आपण निवडणूका पाहतो त्या कशा व्हाव्यात असं सगळं यात आहे. केंद्र सरकार, राज्य सरकार, त्यांचे अधिकार, व्यवस्था असं सगळं लिहून ठेवलंय !



भारताच्या घटनेचं प्रास्ताविक, आपल्याला देश कसा असायला हवा असं दाखवतं. जणू हे दिशा दाखवणारं, ध्येय निश्चित करायला लावणारं साधन आहे. विवेकबुद्धीनं, मनुष्यभावानं हे समजून घेणं आवश्यक आहे.

आपलं संविधान म्हणजे आपला मार्गदर्शक ताराच आहे जणू. ज्या बाबींवर आपली श्रद्धा आहे, ज्या गोष्टी आपल्याला करावयाच्या आहेत, ज्या पद्धतीने आपल्याला करावयाच्या आहेत आणि कोणत्या पद्धतीने आपण आपल्या देशाचा राज्यकारभार चालवणार आहोत ते त्यात नमूद केलं आहे.

लोकांची इच्छा ही सर्वात मोठी बाब आपल्या देशासाठी मानलेली आहे. परंतु संख्येने कमी असणाऱ्या व्यक्तींच्या स्वातंत्र्याचा संकोच बहुमताने होणार नाही याचीही काळजी घेतलेली आहे.




### 2. बदल कसा करायचा ?

देशातील परिस्थिती बदलते, तंत्रज्ञान अथवा विज्ञान प्रगत होत असल्यानं देशाची प्रगती होते आणि म्हणून गरज पडली तर घटनेतील काही मुद्यांमध्ये बदल करावा लागतो. हा बदल कसा करायचा याचेही नियम आहेत. घटनेच्या मूळ तत्वांना, मुद्यांना तसंच ठेवून हा बदल करावा लागतो. म्हणजे जणू घर तसंच ठेवायचं पण खोल्या बदलायच्या! काही वेळा काही खोल्या कमीही करायच्या ! असं आपण सन 2015 पर्यंत 103 वेळा केलंय !

### 3. अनेक राष्ट्रांमधील नियमांचा अभ्यास करुन केलेलं काम

इंग्लंड, फ्रान्स, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, त्या वेळेचा रशिया, दक्षिण आफ्रिका, जपान या व आणखी काही देशांतील नियमांच्या पुस्तकांचा (राज्यघटनांचा) अभ्यास करुन त्यापासून प्रेरणा घेऊन हे काम झालंय.

### 4. मूलभूत हक्कांचा उल्लेख :

भारतातील प्रत्येक नागरिकाला मूलभूत हक्क बहाल करण्यात आले आहेत. समानतेचा हक्क, शिक्षणाचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क, धर्मस्वातंत्र्याचा हक्क, अल्पसंख्य समाजाला संस्कृती जतन करण्याचा हक्क असे हक्क त्यात आहेत.

सुरुवातीला या राज्यघटनेत केवळ हक्कच दिले गेले होते पण आपली नागरिकांची जबाबदारी व कर्तव्ये त्यात नव्हती, हे आश्चर्याचे वाटेल! पण ते तसे आहे. सगळेजण देशासाठी योग्य वागतील हे मानलं होतं, पण तसं झालं नाही. मग 1977 साली त्यात नागरिकांची कर्तव्ये जाणीवपूर्वक घेण्यात आली! सगळयांनीच नीट वागावं म्हणून !

### 5) नागरी स्वातंत्र्य

एकूण 6 नागरी स्वातंत्र्य आहेत. भाषणाचं आणि आपलं मत देण्याचं स्वातंत्र्य, शांततेनं एकत्र जमण्याचं स्वातंत्र्य, लोकांना संघटित करण्याचं स्वातंत्र्य वगैरे. नागरिकांचे हे स्वातंत्र्य अबाधित राहण्यासाठी निरनिराळे कायदे केले आहेत.

### 6) मार्गदर्शक तत्त्वे

देश कसा चालावा याचं दरवेळी शब्दांत वर्णन करणं शक्य नसतं. म्हणून काही वेळेस केवळ मार्गदर्शन केलं जातं. हे आपल्या विवेकबुद्धीनं समजून घ्यायचं आणि मूळ उद्देश लक्षात घेऊन कर्तव्य करायचं यासाठी हे मार्गदर्शन उपयोगाचं असतं. समाजातील आर्थिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न, कामगारांना पुरेसं वेतन देणं, लोककल्याणाची कामं करणं अशी ही तत्त्वे.

देशात 36 राज्ये (काही केंद्रशासित)
सुमारे 8000 शहरे आणि 6 लाख खेडी
अनेक धर्म, अनेक भाषा
125 कोटींचा जनसमूह

15 ऑगस्ट 1947 नंतर गेल्या सुमारे 70 वर्षात आपण खूप प्रगती केली आहे. शिक्षण, आरोग्य, संरक्षण साधने, निरनिराळ्या संस्था, उत्पादने, ग्रामीण विकास, विज्ञान व तंत्रज्ञान विकास, कलांच्या विकासासाठी काम करणाऱ्या संस्था असं बरचं काही आपण पुढं नेले आहे.

## घटनासमितीचे सदस्य

घटनासमितीचे अध्यक्ष – डॉ.राजेंद्रप्रसाद
घटनामसुदा समितीचे अध्यक्ष – डॉ.बाबासाहेब आंबेडकर
मसुदा लेखक – एस्.एन्.मुखर्जी





**इतर सदस्य –**

जवाहरलाल नेहरु, वल्लभभाई पटेल, मौलाना अबुल कलाम आझाद, डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन्, श्री.अलादी कृष्णस्वामी अय्यर, श्री.बी.एन्.राव (सल्लागार घटना समिती), कन्हैय्यालाल मुन्शी, टी.टी.कृष्णम्माचारी, सच्चिदानंद सिन्हा, श्रीकृष्ण सिन्हा, बॅरिस्टर जयकर, सरदार बलदेवसिंग, जगजीवनराम, जॉन मथाई, आचार्य कृपलानी, एच्.व्ही.कामत, पट्टाभी सीतारामय्या, पुरुषोत्तम टंडन, मिनू मसानी, फ्रँक अँथनी, पंडीत हृदयनाथ कुंझरु

**महिला सदस्य –**

अम्मू स्वामीनाथन्, दक्षयानी वेलायुधन, बेगम ऐजाज रसुल, दुर्गाबाई देशमुख, हंसा जीवराज मेहता, कलमा चौधरी, लीला रॉय, मालती चौधरी, पूर्णिमा बॅनर्जी, राजकुमारी अमृता कौर, रेणूका रॉय, सरोजनी नायडू, सुचेता कृपलानी, विजयालक्ष्मी पंडीत, ॲनी मस्करानी












सर्वोच्च न्यायलय

## अजूनही बाकी आहे...

आपण देश घडविण्याचं एक स्वप्न पाहिलं आहे आणि संविधानाच्या रुपानं तसं लिहूनही ठेवलं आहे पण अजून खूप काही बाकी आहे.

- खूप ठिकाणी मुलं, कामगार म्हणून काम करतात.
- रस्त्यात सिग्नलच्या ठिकाणी लहान मुलं, वस्तूंची विक्री करताना दिसतात. त्यांचे चेहरे, त्यांचं आरोग्य, त्यांचं शिक्षण.. मन हेलावून जातं ना ?
- मुलं, मुली सरसास अपशब्द वापरतात.
- मुला-मुलींशी मोठी माणसं गैरवर्तन करतात.
- कितीतरी मुलं, मुली कुपोषणाने त्रस्त आहेत.
- अनेक मुलं, मुली शिक्षणापासून वंचित आहेत.
- काही माणसं आर्थिक भ्रष्टाचार करतात. देशातून पळून जातात. देशाच्या मूलभूत तत्त्वांच्या विरोधात काम करतात, झुंडशाही करतात, गैरमार्ग वापरुन संपत्ती गोळा करतात, अनेकांचं शोषण करतात.
- पर्यावरणाचं प्रदूषण, अन्नाची नासाडी, निरक्षरता, लोकसंख्या वाढ, वाहतूक समस्या, कचरा समस्या, महिला व वृद्ध माणसांचे आरोग्य...
- घरं नसलेली माणसं, त्यांचा निवारा...
- आपल्याला यासाठी जे शक्य आहे त्याची सुरुवात स्वत:पासून करु या. समाजात जो बदल आपल्याला हवा आहे त्यासाठी विचार आणि कृती करु या. अन्यायाला सनदशीर मार्गाने विरोध करु या... हे सतत चालू ठेवायचं व्रत आहे, हे शक्य आहे या भावनेनं करु या...




### ऋणनिर्देश

मराठी विश्वकोश
आम्ही भारताचे लोक - सचिन राव
अनुवाद - नीला आपटे, प्रशांत गावंडे
आम्ही भारतातील मुलं - लीला शेठ, प्रथम प्रकाशन
असा घडला भारत - रोहन प्रकाशन
हा भारत - शीला धर

डेक्कन एज्युकेशन सोसाटीचे
**द्रविड हायस्कूल, वाई**
वाई - 412803. दूरध्वनी : (02167) 227023

लेखन / संकलन, संयोजन - श्री.नागेश मोने
मुखपृष्ठ मांडणी व कला निर्देशन - श्री.शरद प्रभुदेसाई, पुणे
छपाई - व्ही.बी.प्रिंटर्स, पुणे
डॉ.मुजुमदार, (शालासमिती अध्यक्ष)
श्री.विजय मराठे, उपशालाप्रमुख
श्री.कौस्तुभ वैद्य, पर्यवेक्षक
सौ.विद्या मर्ढेकर, शिक्षक प्रतिनिधी
श्री.सूर्यकांत साबळे , शिक्षकेतर प्रतिनिधी

प्रकाशन हस्ते : **श्रीम.उज्वला पवार**, जिल्हा सरकारी वकील, पुणे
दि.26 नोव्हेंबर 2019 (राष्ट्रीय सौर शके 1941-42) रोजी

आर्थिक साह्य - श्री.अनिल बडगुजर, बोरिवली, मुंबई

व्यक्ती साह्य - डॉ.सुनील भंडगे, पुणे , ॲड.प्रकाश कापरे, पुणे
ॲड.सुरेश खामकर, वाई, श्री.भालचंद्र मोने, वाई